# कोरोनामुळे निर्माण झालेल्या स्थलांतरित कामगारांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना

**श्रीरंग दशरथ लभाने**
स्वर्गीय एन.पी.डब्ल्यु. कला, वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय,
सांनगडी, ता. साकोली, जि. भंडारा

---

कोवीड–१९ सर्व देशभर या साथीच्या रोगाने संपूर्ण जगाला भारावून टाकले आहे. त्याचा भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला परिणाम भोगावा लागत आहे. या प्रचंड महामारीवर नियंत्रण ठेवण्याचा आणि त्याला पराभुत करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे संपूर्ण देशाला लॉकडाऊन करावे लागले. म्हणून अपरिहार्य पणे देशाला कुलूपबंद बनावे लागले. या संदर्भात २२ मार्च २०२० ला या महामारीच्या हल्ल्याविरुध्द भारत सरकारने कडक भुमिका करण्यास सुरुवात केली. आदरणीय पंतप्रधानांनी जनता कर्फ्यु पाळण्याचे आव्हान केले. देशाच्या, राज्याच्या, जिल्ह्याच्या सीमा सिल केल्या. आशियात सर्वात अधिक कोरोनाबाधितांची संख्या भारतात आहे. जगात सर्वाधिक काळ चाललेला लॉकडाऊन भारतात झाला. लॉकडाऊन मुळे भारतातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक बाबींवर फार मोठा प्रभाव पडला आहे.

**कामगारांच्या समस्या :**

मोठमोठे उद्योग, कारखाने, व्यवसाय तसेच लघु व सुक्ष्म उद्योग, हॉटेल्स, मॉल, चित्रपटगृहे, पानठेले, गवंडी काम, उस तोडीचे काम, विटांचे काम अशा अनेक उद्योगांवर कोवीड–१९ चा बराच परिणाम झाला. त्यामुळे कामगारांच्या जिवनावर कोवीड १९ चा बराच तडाखा बसला असून त्यांच्यापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. उदा. पुण्यासारख्या अनेक मोठमोठ्य शहरात काम करणा–या असंघटीत कामगारांना कोरोनाने रस्त्यावर रहायची वेळ आणली आहे. शहरातील सर्व कामे बंद झाल्याने कामगार रस्त्यावर आले असून गेल्या अनेक दिवसा पासून ते रस्त्यावरच रहात होते. संचारबंदी मुळे पोलिसांचे फटके खावून ही मंडळी दोन वेळच्या अन्नासाठी भटकत होती.

संपूर्ण शहरात काही दिवसापासून लॉकडाऊन असल्याने सर्व कामे बंद आहेत. शिवाय शहरातून बाहेर जाण्यासाठी रस्ते आणि वाहतूक बंद करण्यांत अली होती. राज्याच्या वेगवेगळ्या भागातून कामासाठी आलेले शेकडो कामगार या परिस्थितीमुळे तिथेच अडकून पडले होते. काम करतांना ही मंडळी ज्या साईटवर काम करायची तिथेच रहायची. पण आता काम बंद असल्याने जायचे कुठे असा प्रश्न निर्माण झाला होता. वाहतुक बंद झाल्याने त्यांना पुढील अनेक दिवस त्यांच्या गावीही जाता येत नव्हते. त्यामुळे त्यांच्या समोर अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यात प्रमुख समस्या दोन वेळच्या जेवणाची होती. या सर्व कामगारांचे पैसे संपल्याने आणि शहरातील हॉटेल्स बंद झाल्यांने त्यांच्या पर्यंत अनेक सामाजिक संस्थांनी ''फुड पॅकेटस'' पोहोचवली तरीही ती अपुरी पडत होती. अशा प्रकारच्या अत्यंत गंभीर समस्या कामगारांच्या जीवनात निर्माण झाल्या. अशाच अनेक समस्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

**बेकारी :—**

कोरोनामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रचंड हानी झाली. शेती उत्पादन, सुक्ष्म, लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना फटका बसला. विविध लोकांचे रोजगार बुडाले; लॉकडाऊनच्या सुरुवातीला असंघटीत क्षेत्रांवर गदा आली. नंतर संघटीत क्षेत्रातही रोजगार कपात झाली. मध्यम व मोठ्या कॉर्पोरेट उद्योगांनीही कर्मचारी कमी केले. लॉकडाऊन अगोदर नौकरी शोधणा—यांची संख्या ३५.४ टक्के होती ती ३६.२ टक्क्यांच्या पुढे गेली. देशातील शहरात प्रत्येक पाचवी व्यक्ती बेरोजगार झाली. ४० ते ५० वयोगटातील पुरुषांना, महिलांना नौकरी गमवावी लागली. लॉकडाऊन मुळे देशातील ४१ लाख रोजगार गेले असून बांधकाम व कृषी क्षेत्राला जोरदार फटका बसला आहे.

**असंघटीत क्षेत्रांना तडाखा :—**

आपल्याकडे ९० टक्के नौक—या असंघटीत क्षेत्रात आहेत. अगदी रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रस्त्यावरचे खेळणी विक्रेते, चहावाले यापासून तर वेटर, गॅरेजवाले, मील मधले तरुण—तरुणी, कागद, काच, भंगार जमा करणारे, बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजुर, अर्धकुशल, अकुशल कामगार अशा हातांवर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरानामुळे संकटे आली आहे. नाट्यक्षेत्रातील कलाकार आणि पडद्यामागे काम करणारे कामगार यांच्या उत्पन्नावरही गदा आलेली आहे.

**कौटुंबिक हिंसाचारात वाढ :—**

कोरोनाच्या काळात भारतात कौटुंबिक हिंसाचाराच्या तक्रारी या राष्ट्रीय महिला आयोगाकडे केल्या जातात. राष्ट्रीय महिला आयोगाच्या ताज्या आकड्यनुसार या लॉकडाऊनच्या काळात आलेल्या तक्रारी सामान्य काळाच्या तुलनेत दुप्पटीने वाढल्या आहेत. तर कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे बिहार, उत्तर प्रदेश, हरियाणा व पंजाब या राज्यात अधिक आहेत. स्त्री—पुरुष यांच्यातील सामाजिक सत्ता संघर्ष व कौटुंबिक हिंसा ३० टक्यांनी वाढली.

कौटुंबीक हिंसाचाराच्या वाढलेल्या घटनां मागील कारणेही अनेक आहेत. आजही समाजातील रुढीवादी विचार सरणीचा पगडा कमी झालेला दिसत नाही. घरकाम करणे ही स्त्रियांचे काम तर बाहेर जाऊन पैसे कमविणे हे पुरुषांचे काम आहे, असे आपल्याकडे मानले जाते. लॉकडाऊनमुळे घरात अडकलेल्या पुरुषांना घरकाम करण्यात सांगीतल्यावर कुठेतरी त्यांचा अहंकार दुखावला जातो.

राष्ट्रीय महिला आयोगाने नोंदविलेल्या आकडेवारी नुसार २० मार्च २०२० ते १६ एप्रिल, २०२० या कालावधीत आयोगाला देशभरातून ५८७ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातील २३९ कौटुंबिक हिंसाचाराच्या आहेत. लॉकडाऊनच्या काळात शोषणकर्ता आणि शोषित दोघेही घरात बंदिस्त राहिल्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना घडल्या.

**दारिद्र्य :—**

कोरोनामुळे संघटीतपेक्षा असंघटीत कामगारांचे अतोनात नुकसान झाले. हातावर पोट असलेल्यांचे रोजगार बुडाले. दोन वेळचे जेवण कसे करावे हाच मोठा प्रश्न त्यांच्या समोर होता. पर्यायाने असंघटीत कामगार दारिद्र्याच्या खाईत खेचला गेला.

**मानसिक आरोग्याची समस्या :—**

टाळेबंदीमुळे आर्थिक फटका तर बसलाच पण मानसिक आरोग्याच्या समस्याही निर्माण झाल्या. अलगीकरणामुळे आलेला शारिरिक व मानसिक ताण आणि हातचे काम जाणे, पगार न मिळणे या मुळे मानसिक तणाव वाढला व तब्येत खालावल्याचे दिसत होते. कोरोणामुळे अनेक कुटुंब एकत्रित आले, त्यामुळे कौटुंबिक वादविवाद निर्माण झालेत. रोजगार गेल्याने आर्थिक तणाव वाढला. तसेच कोरोनाची भिती व चिंता अशा विविध कारणांमुळै अनेकात नैराश्य निर्माण झाले. परिणामी काही प्रमाणात मानसिक रुग्णांची संख्या वाढली.

प्रजाचे संस्थापक व व्यवस्थापकीय विश्वस्त श्री.नितांद्र मेहता यांनी सांगीतले कि, सर्वच क्षेत्रातील उपजिविकेला रोजगाराचा फटका बसलेला आहे. नौकरीवर प्रतिकूल प्रभाव पडला आहे. असे म्हणणा—या लोकांची संख्या ही ३६ टक्के आहे. २८ टक्के लोकांचा पगार कमी केला गेला आहे. २५ टक्के लोकांनी बिन पगारी काम केले आहे आणि १३ टक्के लोकांनी ज्यादा तास काम केले आहे अशी माहिती प्रजाचे संचालक श्री. मिलींद मस्के यांनी दिली. कोरोनामुळे शारीरिक आरोग्यावरच परिणाम झाला नसून मानसिक आरोग्यावरही झाला आहे.

**व्यसनाधिनता :—**

लॉकडाऊनमुळे लोकं घरीच रहात असल्यामुळे व्यसनाधिनता वाढली. लॉकडाऊन मध्ये बार, बिअर शॉपीची व दारुची दुकाने बंद होती. मात्र ज्या दिवशी ही दुकाने सुरु झाली त्या दिवशी अगदी पहाटे पासूनच लोकांच्या लांबच लांब रांगा दुकाना समोर दिसून आल्या. यावरुन व्यसनाधिनतेचे चित्र समोर येते. अमेरिकेत युनिवर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया आणि सॅन फ्रान्सिस्को यांनी १८ ते २५ या वयोगटातील तरुणांचा अभ्यास केला. त्यांचे म्हणणे आहे कि या वयात मुले—मुली सिगारेट ओढतात. त्यांना इतरांपेक्षा कोवीड—१९ चा धोका अधिक आहे. व्यसन करणा—या दर तीन तरुणांपैकी एकाला कोविडचा गंभीर धोका आहे. २४ ते ३४ या वयोगटातही जे स्मोकर्स आहेत त्यांना कोवीडचा अधिक गंभीर धोका संभवतो असे अमेरिकेतील फलोरिडा सीडीचा सर्व्हे सांगतो.

लॉकडाऊनमुळे रोजगार गेल्याने सासू सुनेच्या भांडणात पुरुषाला आपल्या आईची बाजू घेणे, एकत्र कुटुंबात क्षुल्लक कारणातुन निर्माण झालेला अहंकार पतिच्या व्यसन वाढीत हातभार लावतो.

**स्थलांतरणाची समस्या :—**

ग्रामीण भागातून शहरांमध्ये रोजगारासाठी स्थलांतरीत झालेला मोठा वर्ग आहे. लॉकडाऊनमुळे राज्याच्या, जिल्ह्याच्या सर्व सिमा सिल केल्या गेल्या. तसेच शहरातील सर्व कामे बंद झाल्याने, वाहतुक

बंद झाल्याने कामगारांवर उपासमारीची वेळ आली. एवढेच नव्हे तर अनेक कामगारांना आपल्या पत्नी व मुलांना सोबत घेवून कित्येक दिवस पायदळ चालावे लागले. कित्येक दिवस त्यांना पाण्यावरच जीवन काढावे लागले. औरंगाबाद मध्ये अनेक कामगार आपल्या गावी जात असतांना रात्र झाल्यामुळे ते झोपले असतांना त्यांच्या अंगावरुन रेल्वे गेल्यामुळे १६ जणांचा मृत्यु झाला. अशाच काही घटना मुंबईत सुध्दा घडल्या. कामगार आपल्या गावात गेल्यावर सुध्दा त्यांना १४ दिवस विलगीकरणात रहावे लागले अश्या प्रकारे त्यांना स्थलांतरण समस्येचा सामना करावा लागला.

**शिक्षणाची समस्या :—**

लॉकडाऊन मुळे अनेक कामगारांना कामाचे ठिकाण सोडून स्वत:च्या गावी जावे लागले. पहिले जिथे ते रहात होते तीथेच त्यांची मुले शाळेत शिक्षण घेत होती. परंतु ते ठिकाण सोडून स्वत:च्या गावी गेल्याने त्यांच्या मुलांचे शिक्षणही बंद झाले. लॉकडाऊन च्या काळात गावी गेलेले सर्वच कामगार वापस पहिल्या ठिकाणी येणार नाही त्यामुळे आता मुलांना कोणत्या शाळेत टाकावे किंवा कोणत्या शाळेत शिकवावे हा त्यांच्या समारे मोठा प्रश्न उभा राहिला आहे. काही गावात पाहिजे तशा शाळा सुध्दा नाहीत त्यामुळे त्यांची मुले— मुली बाहेर गावी जावून शिक्षण घेवू शकत नाही. तसेच पैशाच्या अभावी उच्च शिक्षण / योग्य शिक्षण सुध्दा घेवू शकत नाही. कित्येक मुलांवर शाळेत न जाता कामावर जाण्याची वेळ आली आहे. परिणामत: अनेक मुला मुलींना शिक्षण मध्येच सोडण्याची वेळ आली. अशा प्रकारच्या अनेक शैक्षणिक समस्या त्यांच्या समोर उभ्या राहील्या आहेत.

**कामगारांच्या समस्यांवरील उपाय योजना : —**

कोविड—१९ दरम्यान कामगारांच्या समस्या कमी करण्यासाठी कामगार आणि रोजगार मंत्रालयाने त्यांनी केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती यावेळी दिली. कोवीड—१९ मुळे लागु झालेल्या राष्ट्रीय लॉकडाऊन मुळे उद्‌भवलेल्या कामगारांच्या समस्यांवर तोडगा काढण्याची गरज असल्याचेही मंत्रालायाने निदर्शनास आणून दिले. कामगारांच्या सद्यस्थितीला सामोरे जाण्यासाठी आणि त्यांच्या काल्याणासाठी शक्य त्या उपाययोयजना सुचवाव्यात असे मंत्रालयाने केंद्रीय व्यापार संघटनांना सांगीतले. उपाय योजना खालील प्रमाणे आहेत —

- देशाच्या विविध भागात अडकलेल्या स्थलांतरीत मजुरांच्या वाहतुकीसाठी अधिक रेल्वेगाड्य उपलब्ध करुन देणे. या मजुरांना त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आर्थिक मदत देणे आणि परिस्थिती नियंत्रणात आल्यावर पुन्हा कामावर परतण्याची सोय उपलब्ध करुन देणे.
- स्थलांतरीत मजुरांना रोजगार आणि इतर व्यवसाय मिळवून देण्यात मदत करण्यासाठी पोर्टेबीलीटी आणि डेटा ट्रान्सफरच्या सुविधांसह स्थलांतरीत कामगार / असंगठीत कामगारांसाठी राष्ट्रीय सुची तयार करणे .

- कर्जावरील व्याजमाफी / पुनर्रचना, अनुदानीत वीज पुरवठा इत्यादी माध्यमातुन एम एस ई बी ना विशेषत: लघु आणि छोट्या उद्योगांना सहाय्य करणे. या उद्योगांना कच्च्या मालाचा योग्य पुरवठा करणे.
- लॉकडाऊनमुळे गंभीर परिणाम झालेल्या हॉटेल्स, चित्रपटगृहे, क्रिडा, वाहन उद्योग यासारख्या क्षेत्रांसाठी सरकारने रणनिती आखण्याची गरज आहे.
- छोटया आणि सुक्ष्म उद्योगांना वेतन घटकात अनुदान देणे, जेणे करुन नियोक्ते लॉकडाऊन कालावधीसाठी सर्व कामगारांना पूर्ण वेतन देवू शकतील.
- महामारीने पिडीत लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी कौतुकास्पद काम करणा—या आशा वर्कर/ आंगणवाडी स्वयंसेवकांना योग्य प्रकारे प्रोत्साहन दिले जाणे आवश्यक आहे.
- लॉकडाऊनमुळे नौकरी गमावलेल्या कामगारांना रोख प्रोत्साहन देण्यांत यावे.
- या काळात कामगारांचे कामाचे तास वाढवू नये.
- कामगार कायदे तसेच कामगार आणि रोजगार मंत्रालयाने वेतन देण्याबाबत आणि वेतन कपात न करण्यासंबंधी जारी केलेल्या सुचनांची कडक अंमलबजावणी करावी.
- असंघटीत कामगार आणि रोजच्या वेतनावर काम करणा—या मजुरांना आर्थिक मदत, रेशन आणि वैद्यकीय सुविधांचा मोफत पुरवठा करावा.
- सरकारने शेतमाल खरेदी करावा, जेणे करुन शेतीमालक शेतातील कामगारांना मजुरी देवू शकतील.
- घरी परत जाणा—या स्थलांतरीत मजुरांकडून रेल्वेचे भाडे घेवू नये.

**संदर्भ : —**


- https://www.mohfw.gov.in/pdf/FinalGuidanceonMangame
- https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus
- कोसंबी राजरत्न, कोरोना : भारतातील सामाजिक, आर्थिक परिस्थिती
- पवार प्रकाश; (२०२०) कोविड—१९ कथा, नव्या युगाची नांदी, मुराळी
- पवार प्रकाश; कोविड—१९ : सामाजिक शास्त्रे आणि सिद्धांताची पुर्नमांडणी
- दै. लोकमत, २७ एप्रिल, २३ जुलै, ३१ डिसेंबर २०२०
- डॉ. नारायण कांबळे (संपा.), समाजशास्त्र संशोधन पत्रिका, मराठी समाजशास्त्र परिषद, अंक, २५ वा, डिसेंबर, २०२०